संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-20
16 JUL 2026
प्राप्त झाले

**सक्तीचा प्रतिक्षाधीन कालावधी मंजूर करणेबाबत.**
**श्रीम. प्रणाली प्रशांत नार्वेकर, लेखा अधिकारी.**

**महाराष्ट्र शासन**
वित्त विभाग,
शासन आदेश :- संलेको-२०२६/प्र.क्र.१०६/E-१६९५८१२/कोषा प्रशा -२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- १३ जुलै, २०२६.

**संदर्भ:-**
१) सहसंचालक (प्रशासन), लेखा व कोषागारे, मुंबई यांचे पत्र क्र.संलेवको /प्रशा-राप/का-६/स.प्र.का./प्र. प्र.नार्वेकर/३.२६/४५४/३६५/१६६० दि. २४.०३.२०२६
२) पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांचे आदेश क्र. पुलदे / २०२५/आस्था / जा. ९०८, दि.१४.८.२०२५
३) संचालनालयाचे आदेश क्र. संलेको / रोख / कार्या- १ / श्रीम. नार्वेकर /प्रतिक्षाधीन / ०८-२०२५/४४५, दि.२१.८.२०२५
४) संचालनालयाचे आदेश क्र. संलेको / २०२५/प्रशा-राप / अति. कार्य / १२७६ /१०६१, दि.०९.१२.२०२५
५) शासन वित्त विभाग, आदेश क्र. संलेको - २०२५ / प्र. क्र. १५६ / कोषा. प्रशा. २, दि.१२.१२.२०२५
६) संचालनालयाचे आदेश क्र. संलेको / रोख / कार्या - १ / श्रीम. नार्वेकर /प्रतिक्षाधीन / १२-२०२५ / ७७३, दि.१६.१२.२०२५
७) संचालक, अभियोग संचालनालय, मुंबई यांचे आदेश क्र. कर्मब / १०४ - अ /२४६७ / २०२५, दि.२४.१२.२०२५
८) अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई यांचे पत्र क्र. अलेका / आस्था- १/ब/वै. न. / नार्वेकर / २२३ / २०२६, दि.११.०३.२०२६
९) महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई यांचे पत्र क्र. कार्यासन - ३/प्रशासन / लेवलेप / कार्यभार / २०२६/५०५४, दि.१३.३.२०२६
१०) वित्त विभाग, शासन निर्णय क्र. सेनिवे १००१ / १३० / सेवा-४, दि.२.६.२००३

-: **शासन आदेश** :-

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील लेखा अधिकारी संवर्गातील श्रीम. प्रणाली प्रशांत नार्वेकर यांना संदर्भ क्र.२ येथील आदेशान्वये पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई कार्यालयातून दि.१४.०८.२०२५ (म.नं.) रोजी एकतर्फी कार्यमुक्त करण्यात आले.

२. संचालनालयाचे संदर्भीय क्र. ३ येथील दि.२१.०८.२०२५ रोजीचे आदेशान्वये श्रीम. नार्वेकर, यांना प्रतिक्षाधीन अधिकारी म्हणून संचालनालयात दि.१८.०८.२०२५ (म.पू.) रोजी रुजू करुन घेण्यात आले व त्यांची सेवा

0/535/2026/1919
17.7.2026

उपयोगात आणण्याकरिता अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई यांना उपलब्ध करुन देण्यात आली. तसेच संचालनालयाचे संदर्भीय क्र. ४ येथील दि.०९.१२.२०२५ रोजीचे आदेशान्वये श्रीम. नार्वेकर यांच्याकडे प्रशासकीय कारणास्तव लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ, मुंबई या पदाचा कार्यभार तात्पुरत्या स्वरूपात सोपविण्यात आला.

३. शासन वित्त विभागाचे संदर्भीय क्र. ५ दि.१२.१२.२०२५ रोजीचे आदेशान्वये पदस्थापनेच्या प्रतिक्षेत असलेल्या श्रीम. नार्वेकर यांना लेखा अधिकारी, सरकारी अभियोग संचालनालय, मुंबई या पदावर पदस्थाना देण्यात आली. त्यानुसार संचालनालयाचे संदर्भीय क्र. ६ येथील दि.१६.१२.२०२५ रोजीचे आदेशान्वये सदर पदावर हजर होण्यासाठी श्रीम. नार्वेकर यांना दि.१५.१२.२०२५ (म.पू.) रोजी संचालनालयातून कार्यमुक्त करण्यात आले.

४. त्यानुसार सरकारी अभियोग संचालनालय, मुंबई यांचे संदर्भीय क्र. ७ येथील दिनांक २४.१२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये श्रीम. नार्वेकर यांना दि.१५.१२.२०२५ (म.पू.) रोजी रूजू करून घेण्यात आले आहे.

५. श्रीम. नार्वेकर, यांना दि.१५.०८.२०२५ ते १४.१२.२०२५ पर्यंत म्हणजेच एकूण १२२ दिवस नियमित पदनियुक्तीचे आदेश मिळेपर्यंत पदस्थापनेशिवाय रहावे लागले आहे. नियमित करावयाच्या कालावधीचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| कालावधी | दिवस | शेरा |
|---|---|---|
| दि.१५.८.२०२५ ते १७.८.२०२५ | ३ दिवस | प्रजासत्ताक दिनाची राष्ट्रीय सुट्टी आणि शनिवार व रविवारची साप्ताहिक सुट्टी |
| दि.१८.८.२०२५ ते २१.८.२०२५ | ४ दिवस | पदस्थापनेच्या प्रतिक्षेत संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई कार्यालयात कार्यरत |
| दि. २२.८.२०२५ ते ९.१२.२०२५ | ११० दिवस | पदस्थापनेच्या प्रतिक्षेत अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई या कार्यालयात कार्यरत |
| दि.१०.१२.२०२५ ते १४.१२.२०२५ | ५ दिवस | पदस्थापनेच्या प्रतिक्षेत महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई या कार्यालयात कार्यरत |
| **एकूण** | **१२२ दिवस** | |

६. श्रीम. नार्वेकर यांना सचिव, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांच्याकडून कार्यमुक्त केल्यानंतर त्या तात्काळ संचालनालयात उपस्थित झाल्या होत्या व त्यांच्या सेवा उपयोगात आणल्या आहेत. त्यामुळे वित्त विभाग, शासन परिपत्रक दि.२०.०२.२००८ मधील तरतूदीनुसार श्रीम. नार्वेकर यांना प्रतिक्षाधीन कालावधी अनुज्ञेय होतो.

७. शासन परिपत्रक दिनांक २०.०२.२००८ मधील सूचना तसेच, म.ना.से. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) १९८१ मधील नियम क्र. ९ (१४) (फ) व ९ (१४) (जी) मधील तरतूदी विचारात घेता, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील लेखा

अधिकारी संवर्गातील श्रीम. प्रणाली प्रशांत नार्वेकर यांचा दिनांक १५.०८.२०२५ ते दिनांक १४.१२.२०२५ पर्यंत एकूण १२२ दिवसांचा सक्तीचा प्रतिक्षेचा कालावधी हा "कर्तव्य" कालावधी म्हणून नियमित करण्यात येत आहे.

तसेच, सदर कालावधीतील वेतन व भत्ते आहरित करण्याकरीता सहायक संचालक (प्रशासन), अभियोग संचालनालय, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

(ता. र. पवार)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत :-

१) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,

२) महालेखापाल १/२, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,*

३) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई,*

४) प्रधान सचिव (लेखा व कोषागारे) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,

५) सहायक अधिदान व लेखा अधिकारी (आस्थापना) अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई,*

६) श्रीम. प्रणाली प्रशांत नार्वेकर, लेखाधिकारी *

७) संबंधित अधिकाऱ्याचे सध्याचे कार्यालय प्रमुख,*

८) निवड नस्ती, कोषा प्रशा -२,

*(संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई यांचे मार्फत)